# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : रविवार 07 मे 1995
**स्थळ** : संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे यांचे निवासस्थान

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री प्रताप विठोबा राणे | 5. श्री हेमंत रमेश राणे |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे | 6. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 3. श्री उदय भगवान राणे | 7. श्री मेघश्याम नारायण राणे |
| 4. श्री सत्यविजय शिवराम राणे | |

उपरोक्त संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक 02 एप्रिल 1995 त्या निर्णयानुसार मा नामदार श्री नारायण तातू राणे यांचा जाहिर सत्कार घेण्याबद्दल व कार्यक्रमाचा पुढील आराखडा ठरविण्याबद्दल कार्यकारीणी व सर्वसाधारण सभासद यांची बैठक दिनांक 07 मे 1995 रोजी श्री प्रताप विठोबा राणे यांच्या निवासस्थानी घेण्यात आली. या सभेस वरील सभासद उपस्थित होते. या सभेत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

1) मा नामदार श्री नारायण तातू राणे यांचा जाहीर सत्कार दिनांक 04 जून 1995 रोजी दामोदर हॉल किंवा शिवाजी मंदिर यापैकी जे सभागृह उपलब्ध होईल त्या ठिकाणी करण्यात यावा असे ठरले.
   या प्रसंगी एक मनोरंजनात्मक कार्यक्रम ठेवावा असे सुचित करण्यात आले. कार्यक्रमाच्या तिकीटाचे दर पुढीलप्रमाणे ठरविण्यात आले.
   रु.15/- ची 300 तिकीटे
   रु.20/- ची 400 तिकीटे
   रु.50/- ची 100 तिकीटे
2) प्रत्येक सभासदांने किमान तिकीटांचे एक पुस्तक संपवावे व त्याची जमा रक्कम खजिनदार श्री उदय भगवान राणे यांच्याकडे करावी असे सर्वानुमते ठरले. या कार्यक्रमाचे स्वतंत्र खाते बँकेत उघडून त्याच्या जमाखर्चाची नोंद करण्याची जबाबदारी खजिनदार श्री उदय भगवान राणे यांची राहील असे ठरले.
3) या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन करून तो यशस्वीरित्या पार पाडण्याची जबाबदारी संस्थेच्या पदाधिकारयांची राहील.
4) कार्यक्रमाच्या तिकीटांची छपाई, हॉल बुकिंग करण्याची जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे यांच्याकडे सोपविण्यात आली.
5) कार्यक्रमाची पुस्तके सर्व सभासदांकडे पोहोचविण्याची जबाबदारी पुढील सभासदांकडे सोपविण्यातआली

| | |
|---|---|
| गोरेगाव ते दहिसर | श्री मेघश्याम नारायण राणे |
| अंधेरी व जोगेश्वरी | श्री सुनिल सदानंद राणे |
| काळाचौकी, वरळी, भायखळा व जे जे | श्री हेमंत रमेश राणे |
| बॉम्बेसेन्ट्रल ते कुलाबा | श्री लक्ष्मण राणे |
| मध्य रेल्वे | श्री उदय भगवान राणे व श्री प्रताप विठोबा राणे |

यानंतर सभेपुढील कामकाज संपल्याने मा अध्यक्षांच्या परवानगीने सभा बरखास्त करण्यात आली.

---